: प्रेसनोट दिनांक- १०/०२/२०२५ :-

**आरोपी लोकसेवक १) श्री.अविनाश मधुकर कोंडीग्रेकर,वय - ४० वर्षे,तत्कालीन तलाठी (ग्राम महसुल अधिकारी) सजा सांगवडे ता.करवीर जि.कोल्हापूर सध्या रा.फ्लॅट नं.२०१ राजगौरव अपार्टमेंट,टेंबलाईवाडी ता.करवीर जि.कोल्हापूर मुळ रा.कोंडीग्रे ता.शिरोळ जि.कोल्हापूर २)श्री.सर्जेराव बंडा कुंभार, कोतवाल सजा सांगवडे ता.करवीर जि.कोल्हापूर रा.कुंभार गल्ली,सांगवडे ता.करवीर जि.कोल्हापूर यांचे लाच मागणीबाबत......**

---

यातील मुळ तकारदार यांचे सांगवडे गांवी गट क. ७६ ,७७ ची शेतजमीन आहे. तकारदार हे आजोबांना व वडीलांना सरळ वारस आहे. त्यामुळे तकारदारांच्या आजोबांचे नांवे असलेल्या जमीनीस वारस म्हणून सातबारा पत्रकी तकारदार यांचे नांव लावणेकरिता तकारदार हे तलाठी कार्यालय सांगवडे येथे गेले असता सांगवडे गावचे तलाठी कोंडीग्रे यांनी कोतवाल सर्जेराव यांना भेटणेस सांगितले. म्हणून तकारदार हे कोतवाल सर्जेराव यांना भेटले त्यावेळे कोतवाल सर्जेराव यांनी आजोबांच्या जमीनीस वारस म्हणून तकारदार यांचे नांव नोंदणी करण्याकरिता त्यांचे स्वत:साठी व तलाठी कोंडीग्रे यांचेसाठी असे दोघांचे मिळून ५०००/-रुपये द्यावे लागतील तेव्हाच वारस म्हणून नांव नोंदणी होईल असे तकारदार यांना सांगितले. त्यावेळी तकारदार यांनी त्यांना काही तरी कमी करा अशी विनंती केली. त्यावेळी कोतवाल सर्जेराव यांनी दोघांचे मिळून ३०००/-रुपयांची मागणी केली म्हणुन तकारदार यांनी अँन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे तकार दिलेली होती.

तकारदार यांचे तकारीप्रमाणे पडताळणी केली असता, तकारदार यांचे सांगवडे गांवी गट क. ७६ ,७७ ची जमीन आहे. तकारदार हे आजोबांना व वडीलांना सरळ वारस आहे. त्यामुळे आजोबांचे नांवे असलेल्या जमीनीस वारस म्हणून सातबारा पत्रकी तकारदार यांचे नांव लावणेकरिता सांगवडे गावचे कोतवाल सर्जेराव कुंभार यांनी स्वत: करीता व तलाठी कोंडीग्रे यांचेकरीता अप्रामाणिकपणे व बेकायदेशीरपणे तकारदार यांचेकडे ५०००/-रू ची मागणी करून तडजोडीअंती ३०००/- रूपये लाचेची मागणी तलाठी कोंडीग्रे यांचेसमक्ष केली तसेच तलाठी कोंडीग्रे यांनीही कोतवाल सर्जेराव यांनी माझेकडे मागणी केलेल्या लाच रकमेस संमती देवून लाच रक्कम सर्जेराव यांचेकडे देण्यास प्रोस्ताहान दिल्याचे निष्पन्न झाल्याने **आरोपी लोकसेवक** १) श्री. अविनाश मधुकर कोंडीग्रेकर,वय - ४० वर्षे,तत्कालीन तलाठी (ग्राम महसुल अधिकारी) सजा सांगवडे ता. करवीर जि.कोल्हापूर सध्या रा.फ्लॅट नं.२०१ राजगौरव अपार्टमेंट,टेंबलाईवाडी ता.करवीर जि.कोल्हापूर मुळ रा.कोंडीग्रे ता.शिरोळ जि.कोल्हापूर २)श्री.सर्जेराव बंडा कुंभार, कोतवाल सजा सांगवडे ता.करवीर जि.कोल्हापूर रा.कुंभार गल्ली,सांगवडे ता.करवीर जि.कोल्हापूर यांचेविरुध्द गोकुळ शिरगाव पोलीस ठाणे कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करणेची प्रकिया सुरू आहे.

सदरची कारवाई श्री.शिरीष सरदेशपांडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, पुणे. डॉ. शितल जान्हवे खराडे, अपर पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, पुणे, श्री. विजय चौधरी, अपर पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, पुणे, वैष्णवी पाटील, पोलीस उप अधीक्षक ला.प्र.वि.कोल्हापूर यांचे मार्गदर्शनानुसार आसमा मुल्ला, पोलीस निरीक्षक,पोहेकॉ/८४८ अजय चव्हाण,पोना २०६१ सचिन पाटील,पोकॉ २३०२ कृष्णा पाटील,चालक सहा.पो.फौ. गजानन कुराडे चालक पोकॉ १२२५ प्रशांत दावणे ला.प्र. वि.कोल्हापूर अँन्टी करप्शन ब्युरो,कोल्हापूर यांनी केली आहे.

सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबतच्या तकारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.

१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१

२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.

३) श्रीमती वैष्णवी सुरेश पाटील,पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९७६४१४०७७७. कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.